**CNR No :- MHSI100000592026**

| | | |
|---|---|---|
| खटला दाखल तारीख | – | १२/०२/२०२६. |
| खटला नोंदणी तारीख | – | १२/०२/२०२६. |
| निकाल तारीख | – | १३/०५/२०२६. |
| कालावधी | – | वर्षे : महिने : दिवस.<br>०० : ०३ : ०१. |

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालय, दोडामार्ग.**
**ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग.**

(पीठासीन अधिकारी वाय. पी. बावकर)
(अधिघोषित दिनांक – १३.०५.२०२६)

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ४०/२०२६
निशाणी क्र. ०६ लगत

प्रथम खबर अहवाल गुन्हा क्रमांक – ०७/२०२६, दि.२०.०१.२०२६.
दोडामार्ग पोलीस ठाणे.

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे अंमलदार,<br>दोडामार्ग पोलीस ठाणे. |
| सहाय्यक सरकारी अभियोक्ता | श्री. ए. व्ही. पेडणेकर |
| आरोपी | नितेश रत्नाकर गवस,<br>वय ३८ वर्षे, धंदा – शेती,<br>रा. आंबडगाव, भरडवाडी,<br>ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग. |
| आरोपीतर्फे वकील | श्री. एस्. पी. देसाई. |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २०.०१.२०२६ |
| प्रथम खबर अहवालाची तारीख | २०.०१.२०२६. |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | १२.०२.२०२६. |
| गुन्ह्याचा दोषारोप नोंदवल्याची तारीख | ०२.०४.२०२६. |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २२.०४.२०२६. |
| न्यायनिर्णय राखून ठेवण्याची तारीख | १३.०५.२०२६. |
| न्यायनिर्णय तारीख | १३.०५.२०२६. |
| शिक्षा सुनवल्याची तारीख, असल्यास | निरंक |

## आरोपीची माहिती

| आरोपीचा क्र. | आरोपीचे नाव | आरोपीच्या अटकेची तारीख | आरोपीची जामीनावर मुक्तता झाल्याची तारीख | आरोपी विरुद्ध निश्चीत करण्यात आलेले गुन्हे | आरोपींची निर्दोष मुक्तता अथवा दोषी ठरवण्यात आले | आरोपीस सुनावण्यात आलेली शिक्षा | कलम ४२८ फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार संपरीक्षेच्या कालावधीमध्ये आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नितेश रत्नाकर गवस | निरंक | ०२.०४.२०२६. | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) प्रमाणे. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

याकामी अभियोगपक्षाने आरोपींविरूध्दचे दोषारोप शाबीत करण्याकरीता खालीलप्रमाणे तीन साक्षीदार तपासले.

अ) अभियोगपक्षाचे साक्षीदार :-

| साक्षीदाराचा क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | कालीदास रामा उसपकर | पंच |
| २. | गणेश उत्तम गवस | पंच |
| ३. | मानसी महेश गावडे | तपासीक अंमलदार |

ब) बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास :-

| साक्षीदाराचा क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :-

| साक्षीदाराचा क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाणीची यादी

अ) अभियोग पक्ष :–

| अ.क्र. | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| ०१. | P1/PW–3 | दि.२०.०१.२०२६ रोजीची फिर्याद. |
| ०२. | P2/PW–3 | दि.२०.०१.२०२६ रोजीचा घटनास्थळ पंचनामा |
| ०३. | P3/PW–3 | दि.२०.०१.२०२६ रोजीची मुद्देमाल पावती |
| ०४. | P4/PW–3 | दि.२०.०१.२०२६ रोजीची आरोपी नोटीस |
| ०५. | P5/PW–3 | दि.२०.०१.२०२६ रोजीचे अग्रेषीत पत्र |

ब) बचाव पक्ष :–

| अनुक्रमांक | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क) न्यायालयीन निशाणी :–

| अनुक्रमांक | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

ड) मुद्देमाल तपशील :–

| अनुक्रमांक | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## –: न्यायनिर्णय :–

(दिनांक १३ मे, २०२६ रोजी घोषित केला)

अभियोग पक्षाने आरोपीच्या विरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ कलम ६५(ई) च्या गुन्ह्यासाठी प्रकरण चालविले आहे.

०२. आरोपीची **नि.क्र.०६** येथे संक्षिप्त संपरिक्षा नोंदविली, त्याने गुन्हा अमान्य केला व अभियोग चालविण्याची विनंती केली.

०३. सदर कामी दाखल असलेले दोषारोपपत्र, अभियोग पक्षातर्फे तपासणेत आलेला साक्षीदार, लेखी व तोंडी पुरावा यावरून खालील मुद्दे माझे

अवलोकनार्थ समोर येतात. सदरचे मुद्दे, त्यांचे निष्कर्ष व त्यावरील कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नमुद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दि.२०.०१.२०२६ रोजी दोडामार्ग तालुक्यातील आंबडगाव, वझरे, भरडवाडी येथे २१:१५ वा.चे सुमारास दारुबंदी गुन्ह्यांतर्गत छापा घातला असता घराच्या पाठीमागील बाजुस आरोपीच्या ताब्यातील दोन बंधांच्या पिशवीमध्ये गोल्डन ए.सी.ई.ब्लू फाईन व्हीस्की असे इंग्रजी लेबल असलेल्या १८० मिली मापाच्या २४ दारुच्या बाटल्या कि.सु.२४००/- असा मुद्देमाल मिळुन आला व सदरचा मद्यनिषेध मुद्देमाल गैरकायदा व विनापरवाना विक्रीच्या उद्देशाने बाळगुन आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा केला ? | नकारार्थी. |
| २. | अंतिम आदेश काय ? | आरोपीची अंतीम आदेशान्वये निर्दोष मुक्तता करणेत येते. |

## -:: कारणमिमांसा ::-

०४. अभियोगपक्षाचा पुरावा, **नि.क्र.१३** वरील पुरावा संपल्याच्या पुरसीसीस अनुसरुन दि.३०.०४.२०२६ रोजी बंद करण्यात आला व आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम 351(1)(b) अन्वये निवेदन दि.०५.०५.२०२६ रोजी नोंदविण्यात आले. आरोपीने त्याला खोट्या गुन्ह्यात अडकविल्याचा बचाव घेतला आहे.

<u>**मुद्दा क्र. १**</u> –

०५. अभियोग पक्षाने आरोपी विरुद्ध गुन्हा शाबीत करण्याकरीता साक्षीदार क्र.०३ तपासीक अंमलदार म.पो.ना. मानसी गावडे यांची साक्ष नोंदविली. सदर साक्षीदाराने साक्षीपुराव्यात, दि.२०.०१.२०२६ रोजी दोडामार्ग येथे कार्यरत असताना समीर सुतार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा रजि. क्र.०७/२०२६ दाखल होऊन गुन्हयाचे प्राथमीक तपासकाम पो.नि. खोपडे यांनी केल्याचे कथन केले. त्यांनी साक्षीपुराव्यात, समीर सुतार यांनी दाखल केलेली फिर्याद नि.क्र.P–1/PW3 वर, पो. नि. खोपडे यांनी केलेला घटनास्थळ पंचनामा नि.क्र.P–2/PW3 आणि मुद्देमाल पावती नि.क्र.P–3/PW3 वर न्यायकक्षात ओळखले. साक्षीपुराव्यात पुढे, तपासकाम सोपविल्यानंतर आरोपीस नोटीस पारीत केल्याचे कथन करुन सदर नोटीस नि.क्र.P–4/PW3 वर ओळखली, साक्षीदारांची टिपणे नोंदविली, मुद्देमाल न्यायसहाय्यक वैज्ञानीक प्रयोगशाळा, कोल्हापूर येथे प्रत्यंतराकरीता पाठविल्याचे कथन करुन दि.०३.०२.२०२६ रोजीचे अग्रेषीत पत्र नि.क्र.P–5/PW3 वर न्यायकक्षात ओळखले. त्यानंतर राजेश नाईक यांचे कॅरीअर टिपण नोंदवुन आरोपी विरुद्ध सबळ पुरावा आल्याने त्याच्याविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याचे कथन केले.

०६. अभियोग पक्षाच्या कथनानुसार आरोपीच्या ताब्यातील मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला, हे सिध्द करणेकरीता अभियोग पक्षाने साक्षीदार क्र.०१ पंच कालीदास रामा उसपकर व साक्षीदार क्र. ०२ पंच गणेश उत्तम गवस यांची साक्ष

नोंदविली. सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षास पुरक साक्ष न दिल्याने विद्वान सरकारी वकीलांनी त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारले असता त्यातून आरोपी विरुद्ध आवश्यक माहिती पटलावर आलेली नाही.

०७. न्यायालयासमोर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले. अभियोग पक्षाने आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्यासाठी तपासी अंमलदार साक्षीदार क्र.०३ म.पो.ना. मानसी गावडे यांची साक्ष नोंदविली आहे. सदर साक्षीदाराने गुन्हा नोंद, तपास प्रक्रिया, नोटीस, अग्रेषित पत्र व दोषारोपपत्र यासंबंधीची कागदपत्रे ओळखून दिली आहेत. तथापि, त्यांच्या साक्षीतून आरोपीने गुन्हा केल्याचा प्रत्यक्ष व स्वतंत्र पुरावा समोर आलेला नाही. तपासी अधिकाऱ्याची साक्ष ही मुख्यतः तपासाच्या प्रक्रियेपुरती मर्यादित असून ती स्वतःहून दोषसिद्धीसाठी पुरेशी ठरत नाही. प्रस्तुत प्रकरणी पंचांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. परिणामी, कथित जप्तीची कार्यवाही स्वतंत्र व विश्वासार्ह पुराव्याने सिद्ध झालेली नाही. फौजदारी न्यायशास्त्रानुसार आरोपीविरुद्धचा गुन्हा वाजवी शंकेपलीकडे सिद्ध करणे ही अभियोग पक्षाची जबाबदारी असते. सदर प्रकरणात जप्ती पंचनाम्यास समर्थन देणारा स्वतंत्र पुरावा उपलब्ध नाही. तपासी अधिकाऱ्याची एकमेव औपचारिक साक्ष, पंच साक्षीदारांच्या असहकार्याच्या पार्श्वभूमीवर, दोषसिद्धीसाठी पुरेशी मानता येत नाही. त्यामुळे अभियोग पक्ष आरोपीविरुद्धचा गुन्हा शाबीत करण्यात अपयशी ठरलेला आहे.

०८. सर्वात महत्वाची बाब म्हणजे अभियोग पक्षाने प्रस्तुत कामामध्ये रासायनिक पृथःकरण अहवाल दाखल न केल्याने आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेला मुद्देमाल इथाईल अल्कोहोल म्हणजेच प्रतिबंधीत द्रव्य आहे हे अभियोग पक्षातर्फे सिध्द करणेत आलेले नाही. तसेच, याकामी जप्त करणेत आलेला मुद्देमालही न्यायालयासमोर हजर करणेत आलेला नाही. सबब, तोच मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून पंचासमक्ष जप्त केला हे निःसंशयरित्या शाबीत झाले असे म्हणता येणार नाही.

०९. अभियोगपक्षाने आरोपी विरुद्धचा गुन्हा संशयापलीकडे जाऊन शाबीत करणे आवश्यक असताना प्रस्तुत गुन्हा संशयापलीकडे जाऊन सिद्ध केलेला नाही. त्यामुळे अभियोगपक्षाचा पुरावा आरोपीस दोषी धरण्याइतपत पुरेसा नाही. सबब, सबळ पुराव्याअभावी आरोपीस दोषी धरता येत नाही व तो निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. म्हणून मुद्दा क्र. १ करीता "**नकारार्थी**" उत्तर देत आहे.

**मुद्दा क्र. ०२ –**

१०. प्रस्तुत कामातील जप्त करणेत आलेला दोषारोपपत्रातील अ.क्र. ०१ कडील मुद्देमाल नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्याकरीता अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सिंधुदुर्ग यांचेकडे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम १०० अन्वये पाठविणे न्यायोचित आहे. माझ्या वरील विवेचनावरुन न्यायालयासमोर आलेला पुरावा हा आरोपी विरुध्दचा दोषारोप संशयापलीकडे जाऊन शाबित करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे

पारीत करीत आहे:-

## -: **आ दे श** :-

१. आरोपी नितेश रत्नाकर गवस, वय-३८ वर्षे, रा. आंबडगाव, भरडवाडी, ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) नुसार दाखल दोषारोपातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तिक व जामीनदाराचे बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३. दोषारोपपत्रातील नमूद अ.क्र.०१) ए.सी.ई.ब्लू फाईन व्हीस्की असे इंग्रजी लेबल असलेल्या १८० मिली मापाच्या २४ दारुच्या बाटल्या कि.सु.२४००/- हा जप्त मुद्देमाल अपील कालावधी पूर्ण झाल्यानंतर नियमाप्रमाणे नाश करणेसाठी अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, सिंधुदुर्ग यांच्याकडे पाठविणेत यावा.

४. उपरोक्त नमुद मुद्देमाल ठेवण्याकरीता वापरण्यात आलेली दोन बंधाची कापडी पिशवी हा मुद्देमाल मुल्यहीन असल्याने अपील कालावधी पूर्ण झाल्यानंतर नियमानुसार नाश करण्यात यावा.

५. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ अन्वये वैयक्तिक बंधपत्र रुपये १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) चे द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदीत व उद्घोषीत केला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2026.05.13 12:31:38 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बावकर)
दिनांक – १३.०५.२०२६. न्यायदंडाधिकारी वर्ग – १,दोडामार्ग.

**प्रमाणपत्र**

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | नरेंद्र गोविंद प्रभु. |
| न्यायालय | न्यायदंडाधिकारी वर्ग–१, दोडामार्ग |
| न्यायनिर्णय घोषीत दिनांक | १३.०५.२०२६. |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेचा दिनांक | १३.०५.२०२६. |
| न्यायनिर्णय अपलोड केलेचा दिनांक | १३.०५.२०२६. |